**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०४**

**नाव – शौकत महेताब शेख**

**वय – ५७ वर्षे,**

**व्यवसाय – काही नाही**

**पत्ता – नोबल कॉलनी, उदगीर**

**साक्षीदार क्र.०४ यांचा शपथेवर सरतपास सरकारतर्फे अभियोक्ता श्री.ए.एस.कदम यांच्याद्वारे सुरुः–**

बेबी फातेमा ही माझी पुतणी आहे. वाशीम शेख तिचा नवरा होय. सन २०१२ साली त्यांचे लग्न झालेले होते. दोन तीन महिने तिला नीट नांदवले, नंतर भांडण होऊ लागले. पैश्यांच्या मागणीवरून त्यांच्या भांडणे होऊ लागली. ते आमच्याकडे एक लाख रुपये मागत होते, आम्ही त्यांना एक लाख रुपये दिले नाहीत. ते मुलीकडे पैश्याचा तगादा करत होते. त्यामुळे आम्ही पोरीला घेऊन परत आलो. आम्ही पुन्हा वाद मिटवण्याचा प्रयत्न केला असता पैसे दिल्याशिवाय नांदवणार नाही असे त्यांनी सांगितले. कोर्टासमोर असणारे आरोपी तेच आहेत.

**साक्षीदार क्र.०४ चा उलटतपास आरोपी क्र.१ ते ५ यांच्यातर्फे श्री.ए.के.सय्यद, विधीज्ञ यांचेद्वारे शपथेवर सुरुः–**

पैश्यांसाठी मारहाण केली म्हणून आम्ही एन.सी. दाखल केली नाही. लग्न सन २०१२ साली झाले व फिर्याद पण सन २०१२ सालीच झाली. हे म्हणणे खरे नाही की, माझी पुतणी आरोपीकडे न नांदता स्वतःहून परत आली. माझ्या पुतणीचे आता दुसरे लग्न झालेले आहे. वशीम हा लांबून आमचा पाहुणाच लागतो. हे म्हणणे बरोबर आहे की, आरोपींनी मुलीला आधी पसंद करून लग्न केले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मुलीला

दिसायला चांगली नाही, काळी आहे असे म्हणून हिनवायचे हे मी खोटे सांगत आहे. फिर्यादी माझ्या भावाची मुलगी होय. हे म्हणणे खरे नाही की, भावाला मदत करायला मी खोटी साक्ष देत आहे.

फेर तपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.07.22 17:17:49 +0530

**ठिकाणःउदगीर** **न्यायदंडाधिकारी प्र.व.**

**दिनांक – २२/०७/२०२६** **(न्यायालय क्रं. १), उदगीर.**